# अनंत आशीर्वादांचा समय

## *भगवान नित्यानंदांची पुण्यतिथी*

ईशा सरदेसाई यांच्याद्वारे लिखित

सिद्धयोग मार्गावर ऑगस्ट महिन्याच्या परिचयामध्ये मी सांगितले होते की, या महिन्यात केंद्रण करण्यासाठी श्रीगुरुमाईंनी ध्यान आणि मंत्रजपाचे अभ्यास दिले आहेत. तेव्हा, आपण हे केंद्रण आणि ऑगस्ट महिन्यात येणारे सिद्धयोगाचे प्रत्येक पर्व, यांचा परस्पर संबंध जोडू शकतो.

या पर्वांपैकी पहिले पर्व आहे, भगवान नित्यानंदांची पुण्यतिथी. सौर दिनदर्शिकेनुसार बडे बाबांची पुण्यतिथी ८ ऑगस्टला आहे, तर चांद्रतिथीनुसार ती त्याच्या पुढील दिवशी म्हणजे ९ ऑगस्ट रोजी [भारतामध्ये १० ऑगस्ट रोजी] आहे. ऑगस्ट महिन्याच्या परिचयामध्ये मी सांगितले होते की, बडे बाबांची पुण्यतिथी ही त्या पावन दिवसाची स्मृतितिथी आहे जेव्हा ते ब्रह्मलीन झाले होते, अर्थात वर्ष १९६१मधील तो दिवस जेव्हा त्यांनी त्यांच्या भौतिक देहाचा त्याग केला व ते परम चितीमध्ये विलीन झाले. ‘विवेकचूडामणि’ या शास्त्रग्रंथामध्ये महान ऋषी आदि शंकराचार्य यांनी एक उपमा दिली आहे ज्यायोगे आपल्याला स्पष्टतेने हे समजण्यास मदत होऊ शकते की, एका आत्मसाक्षात्कारी महापुरुषाच्या देहत्यागाचा अर्थ काय असतो. आदि शंकराचार्य म्हणतात :

> जेव्हा एक मातीचा घडा फुटतो, तेव्हा त्यातील आकाश हे बाह्य अनंत आकाशाशी एकरूप होते. त्याच प्रकारे, जेव्हा बाह्यरूपाचा विलय होतो, तेव्हा परब्रह्माचा ज्ञाता हा स्वतः परब्रह्मच होतो.[१]

बडे बाबा हे आपल्या ब्रह्मांडात व्याप्त असलेल्या परम चितीशी एकरूप आहेत, एकरूप होते आणि सदैव एकरूप राहतील. शरीर हे नश्वर असू शकते; परंतु गुरुशक्ती नाही. म्हणूनच, बडे बाबांची उपस्थिती आणि त्यांचे आशीर्वाद, पासष्ट वर्षांनंतर, आजदेखील इतक्या चैतन्यमय रूपाने आपल्यासोबत आहेत. [भारतीय परंपरेत आणि सिद्धयोग मार्गावर आपण थोर विभूतींच्या महानिर्वाणाच्या पुण्यदिनाचे स्मरण का करतो, याविषयी अधिक जाणून घेण्यासाठी मी तुम्हाला या विषयावरील वेबसाइटवर [हिंदीमध्ये] दिलेले भाष्य वाचण्यास प्रोत्साहित करते ज्याचे शीर्षक आहे, ‘पुण्यतिथि : एक जन्मसिद्ध के अवतरण का सम्मान’.]

जेव्हा मी बडे बाबांविषयी विचार करते, विशेषतः त्यांच्या पुण्यतिथीच्या प्रसंगी, तेव्हा अनेकदा माझे मन श्रीगुरुमाईंच्या 'निराकार मंदिर' या सुंदर कवितेकडे आकृष्ट होते. या कवितेत श्रीगुरुमाई सांगतात की, अवघे ब्रह्मांड हे बडे बाबांचे मंदिर आहे—आणि त्या हेदेखील सांगतात की, उदाहरणार्थ, आपण सृष्टिसौंदर्यात बडे बाबांचे दर्शन घेऊ शकतो. श्रीगुरुमाई समजावतात की, असे करणे म्हणजे "उघडया डोळ्यांनी ध्यान करणे" होय.

मला आठवते की, मी जेव्हा पहिल्यांदा श्रीगुरुमाईंची ही कविता वाचली होती, तेव्हा मी मंत्रमुग्ध झाले होते. बडे बाबा कोण आहेत आणि कोण होते याविषयीची माझी समज, व त्याचबरोबर सिद्धयोग ध्यान काय असू शकते याविषयीचा माझा बोध या कवितेमुळे आणखी व्यापक झाला. हा असा अभ्यास आहे जो करण्याकरता आपण स्वतःला आपल्या जगापासून वेगळे करण्याची गरज नाही. आपण याच जगात आणि या जगताच्या सान्निध्यात राहून ध्यान करू शकतो; खरे तर, यामुळे ध्यानाच्या आपल्या अभ्यासाला *प्रेरणा मिळू शकते.* आपल्या कवितेमध्ये श्रीगुरुमाईंनी सृष्टीतील अनेकानेक उदाहरणे, तसेच मानवनिर्मित गोष्टींचीदेखील उदाहरणे दिली आहेत ज्यांच्या माध्यमातून आपण बडे बाबांचे सान्निध्य अनुभवू शकतो. या सर्व गोष्टींमध्ये आपल्याला त्या मूलभूत चेतनेची अनुभूती होऊ शकते, त्या शक्तीची अनुभूती होऊ शकते जिचा शोध आपण ध्यानामध्ये घेत असतो, जिच्यापर्यंत पोहोचण्याचा आपण प्रयत्न करत असतो.

अर्थातच, अशा दृष्टिकोणाने जगाकडे पाहण्यासाठी काही प्रमाणात प्रयत्न करावा लागू शकतो—ध्वनीमध्ये विद्यमान असलेले मौन ऐकण्यासाठी, क्रियाकलापाच्या मुळाशी असलेल्या स्थिरतेची व शांततेची अनुभूती करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असू शकते. याच कारणास्तव, आपण अतिशय भाग्यवान आहोत की, सिद्धयोग मार्गावर श्रीगुरूंनी आपल्याला या बोधाप्रत पोहोचण्यासाठीचे प्रत्यक्ष साधन प्रदान केले आहे. आपल्याला 'ॐ नमः शिवाय' हा मंत्र प्रदान केला गेला आहे.

जे जिज्ञासू बडे बाबांकडे येत, त्यांना बडे बाबा हा मंत्र प्रदान करत असत. ही गोष्ट सर्वश्रुत आहे की, बडे बाबांनी प्रदान केलेल्या मंत्राद्वारेच बाबा मुक्तानंदांना शक्तिपात दीक्षा प्राप्त झाली. बडे बाबांनी शिकवले आहे की, मंत्रजपाच्या अनेकानेक फळांपैकी एक आहे, ऐक्याची अनुभूती—म्हणजेच भगवंताशी ऐक्य, श्रीगुरूंशी ऐक्य, एखाद्या व्यक्तीचे बाह्य जगत तसेच आंतरिक जगत यांच्यातील ऐक्य.

मंत्रजपाविषयी जी गोष्ट मला सर्वाधिक आवडते ती ही आहे की, हा एक असा अभ्यास आहे जो आपण वास्तवात कुठेही करू शकतो. आणि अनेकदा असे घडते की, मी जेव्हा मंत्राच्या सान्निध्यात

असते, म्हणजे, मी जेव्हा त्याचे स्मरण करते, माझ्या दैनंदिन जीवनात जेव्हा मी त्याचा जप करते, तेव्हा मला त्या ऐक्याची झलक मिळते ज्याविषयी बडे बाबा शिकवतात. उदाहरणार्थ, मी विचार करते की, श्रीगुरुमाईंनी आपल्याला ‘जप-वॉक’ करण्यास म्हणजे मंत्रजप करतकरत फेरफटका मारण्यास प्रोत्साहित केले आहे. इतकेच नव्हे तर, सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटद्वारे त्यांनी आपल्याला *त्यांच्यासमवेत* जप-वॉक करण्यास [जप करत त्यांच्यासमवेत चालण्यास] आमंत्रितदेखील केले आहे! माझा असा अनुभव आहे की, मी जेव्हा चालताचालता मनातल्या मनात मंत्रजप करते, तेव्हा अखेरीस एक असा क्षण येतो जेव्हा असे वाटू लागते की, जणूकाही मंत्र हा चहुबाजूंनी उद्भवतो आहे *आणि त्याचबरोबर* तो कुठूनही उद्भवतो नसतो. तो वाऱ्याबरोबर सळसळणाऱ्या पानांमध्ये असतो. तो पाण्याच्या पृष्ठभागावर नृत्य करणाऱ्या सूर्यकिरणांमध्ये असतो. मी चालत असताना तो माझ्या पावलांच्या ध्वनीमध्ये आणि माझ्या हृदयाच्या ठोक्यामध्येही असतो. तो माझ्या सभोवतालच्या असंख्य रूपाकारांमध्ये स्वतःला प्रकट करत असतो.

आपली आध्यात्मिक साधना ही नेहमीच आपल्या सभोवतालचे वातावरण पूर्णपणे स्तब्ध आणि शांत असण्यावर अवलंबून नसते, ही गोष्ट किती दिलासा देणारी आहे, होय ना? भारतीय शास्त्रग्रंथ आपल्याला सांगतात की, हे जगत मुळात एका ध्वनिस्पंदनातून म्हणजे आदिनाद ‘ॐ’ यातून उदयास आले आहे. अलीकडेच मला श्रीगुरुमाईंकडून समजले की, फुलेदेखील उमलत असताना एक ध्वनी प्रसृत होतो. या ध्वनिलहरींची कंपने इतकी सूक्ष्म असतात की, ती आपल्याला आपल्या केवळ कानांनी ऐकू येत नाहीत, तथापि, त्या ध्वनीचे अस्तित्व हे असतेच. कोणत्या ना कोणत्या पातळीवर तो प्रतिध्वनित होत असतो. भगवान नित्यानंदांच्या पुण्यतिथीच्या प्रसंगी हे विस्मयजनक, प्रेरणादायी ज्ञान मनात धारण करून ठेवण्याजोगे आहे, अशा प्रसंगी जेव्हा आपण आपल्या जगताकडे पाहून या गोष्टीचे स्मरण करत आहोत की, हे सर्वकाही बडे बाबांचे निवासस्थान आहे, त्यांचे मंदिर आहे, ज्या निराकाराला असंख्य रूपाकार दिले गेले आहेत.

© २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

---

[१] विवेकचूडामणि, श्लोक ५६५; इंग्रजी भाषांतर © २०२६ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन.